नियमित दिवाणी दावा क्र.७४/२०१७
CNR No.MHKO12-000320-2017
निशाण क्र.५ सोबत.

# // निशाण क्र.५ वरील आदेश //

प्रस्तुतचा अर्ज वादींनी प्रतिवादीविरूध्द दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९, नियम १ व २ प्रमाणे तुर्तातूर्त मनाईकरिता दाखल केलेला आहे.

२) **दावा मिळकतीचे वर्णन :—**

मौजे मेघोली, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथील जमीन गट नं.६५, क्षेत्र ५—०९ आर., त्याच्या चतु:सिमा — पुर्वेस : गट नं.५७, पश्चिमेस : गट नं.६५, दक्षिणेस : गावठाण तळकरवाडी आणि उत्तरेस : ओढापात्र व बळवंत दत्तु तळकर यांची जमीन, येणेप्रमाणे चतु:सिमेतील जमिनीचे दक्षिणेस व गावठाणच्या उत्तरेस पश्चिमेकडील ओढा पात्रापासून पश्चिमेकडून पुर्वेकडे गट नं.६५ मध्ये दक्षिण बाजुकडून व तेथून पुढे अन्य शेतीकडे ये—जा करणेसाठी वादी प्रतिवादींनी त्यांना व गावातील अन्य इसमांना शेतीकडे जाणेसाठी ठेवलेला दक्षिणोत्तर १२ फुटाचा रस्ता, हा या दाव्याचा वाद विषय आहे (येथून पुढे सदर मिळकतीस ''दावा मिळकत'' असे संबोधण्यात आलेले आहे).

३) वादी यांची थोडक्यात केस अशी की, दावा मिळकत ही मुळची सरकारी हक्कातील मुलकी पड जमीन असून वादी नं.१ व २ यांचे पुर्वहक्कदार तुकाराम तळकर यांनी कसवणुकीस स्विकारली व त्यानंतर सदरची जमीन तुकाराम तळकर यांनी त्यांचे हयातीमध्ये जानबा, भागोजी व रामचंद्र यांच्या नावे गावच्या आणेवारीप्रमाणे भावांना कसवणुकीस दिली.

वादी नं.१ व २ हे सदर जमिनीमध्ये ४ आणे ९ पै. म्हणजे १ हेक्टर ५१ आर. क्षेत्र तुटक कब्जा वहिवाटीत आहेत. तसेच वादी नं.२ व त्याचे बंधु कृष्णात व केशव तळकर व वादी नं.४ व त्यांचे भाऊ बळवंत, महादेव, सुभाष, उत्तम, रामचंद्र तळकर यांचे वहिवाटीत ३ आणे ९ पै व प्रतिवादी व त्यांचे भाऊ मयत पांडूरंग, त्याचे वारस प्रकाश, नारायण, हरी, शिवाजी ज्ञानबा तळकर यांच्या हिस्सेस ३ आणे ९ पै चे क्षेत्र तुटक वहिवाटीस आहे. दावा मिळकत वादी नं.१ व २ चे वडील तुकाराम तळकर यांनी स्वत: सरकार हक्कातून स्विकारलेली असलेने त्यांना १ आणा ९ पै क्षेत्र जादा देणेत आले व तशी नोंद ७/१२ व ८अ पत्रकी वादी नं.३ व ४ यांचे पुर्वहक्कदार व प्रतिवादीचे पुर्वहक्कदार यांच्या संमतीने मालक सदरी नोंद झालेली आहे.

४) वादी यांच्या म्हणण्यानुसार, यातील प्रतिवादी यांनी वादी नं.१ व २ हे दावा मिळकतीमध्ये विहीर काढू लागल्याने त्यांचेविरूध्द या न्यायालयात दावा दाखल केला होता. सदरचा दावा आपसात मिटून दावा मिळकतीच्या ७/१२ वरील क्षेत्राप्रमाणे वाटण्या करण्यात आल्या. दावा मिळकतीमध्ये जो ओढा दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहत गेलेला आहे त्या ओढ्यालगत गावठाणाच्या पश्चिमेस वादी प्रतिवादी यांचा गट नं.५८अ हा आहे. त्यामधील वादी व प्रतिवादी यांचेकडे प्रत्येकी ०–२.५ आर. क्षेत्र वहिवाटीस आहे. सदर ओढापात्राच्या पुर्वेस जे वादी नं.१ व २ यांना जादा १ एकर क्षेत्र वाटणीस आलेले आहे त्यामध्ये वादी नं.१ व २ यांनी सन १९९५–९६ साली विहीर काढलेली आहे व त्या विहीरीवर वादी नं. १ व २ यांनी उपसायंत्र इलेक्ट्रिक मोटार बसवून त्याचे पाणी ते सदर गटातील क्षेत्राना व अन्य क्षेत्राना

व वादी नं.२ व त्याच्या भावांना ऊस पिकासाठी देतात.

५) वादी यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या क्षेत्राच्या शेताचे पुर्वेस व वादी नं.३ व त्यांचे बंधू यांच्या वहिवाटीच्या क्षेत्रालगत वाटणीमध्ये प्रतिवादीस घर बांधण्यासाठी जागा दिली होती. सदर जागेच्या दक्षिणेकडे वादी प्रतिवादीने त्यांच्या हिस्सेच्या ओढापात्राच्या पुर्वेस जी जमीन आहे त्या जमिनीमध्ये शेतीची कामे करणेच्या दृष्टीने ये—जा करणेसाठी पुर्वापार ५० ते ६० वर्षापासून पुर्व पश्चिम व गावठाणाच्या उत्तरेस अंदाजे १५ फुट दक्षिण उत्तर रूंदीचा रस्ता ठेवलेला आहे. सदर रस्त्याला लागून उत्तर बाजूस प्रतिवादीने ज्यावेळी वादी प्रतिवादीमध्ये जमिनीच्या वाटण्या करून घेतल्या त्यावेळी बांधलेले घर पाडून प्रतिवादीने नवीन घर बांधलेले आहे व सदर गटामध्ये जो वहिवाटीचा रस्ता गावठाणाच्या उत्तर बाजूस व ओढा पात्राच्या पुर्वेस व गटाच्या दक्षिणेस असलेला रस्ता बंद करणेच्या उद्देशाने बेकायदेशीररित्या वाढीव घराचे बांधकाम करू पाहत आहेत. तसे झालेस वादी व गावातील इतर लोकांचा शेताकडील जाणेचा रस्ताच बंद होणार आहे. याबाबत वादीने तंटामुक्त समितीकडे तोंडी कळविले परंतू त्याचा काहीही उपयोग न होता उलट प्रतिवादी व त्याचे कुटूंबियांनी वादी नं.१ यास मारहाण करून शिवीगाळ केली. वादीने पोलीस स्टेशनकडे फिर्यादही दाखल केली परंतू प्रतिवादी पोलीस स्टेशनला येणेस टाळाटाळ करत आहे. सबब, प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी गावठाणाच्या उत्तरेस दावा मिळकतीच्या दक्षिणेस असलेल्या शेताकडील जाणाऱ्या वहिवाटीच्या रस्त्यामध्ये बांधकाम करू नये, अशी प्रतिवादीविरूध्द तुर्तातूर्त मनाईची ताकीद होवून मिळणेसाठी सदरचा अर्ज वादीने दाखल केलेला आहे.

६) प्रस्तूत कामी प्रतिवादी यांनी नि.१६ वर आपले म्हणणे सादर करून वादींचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली. प्रतिवादीने वादींचे कथन पुर्णपणे नाकारलेले आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, दावा मिळकतीसह अन्य वडिलार्जीत शेत व घर मिळकतीबाबत प्रतिवादी यांचे वडील ज्ञानु न्हानु तळकर यांनी या न्यायालयात रे.क.नं.१८/१९९३ चा सरस निरस मानाने धडे वाटप व तुटक कब्जा होवून मिळणेसाठी दावा दाखल केला होता. त्यामध्ये प्रस्तूत वादी नं.१, २ तसेच वादी नं.३, ४ व प्रतिवादीचे वडील यांचे दरम्यान आपसात तडजोड होवून दि.०६/०२/१९९६ ला तडजोड हुकूमनामा झाला असून दावा मिळकतीमध्ये त्यावेळी असणारे बांधीव घर व त्याचे लगत पश्चिमेस असणारे अंदाजे ४ गुंठे क्षेत्र हे प्रतिवादीचे वडील ज्ञानु तळकर यांचे वाटपास दिले असून घर व ४ गुंठे क्षेत्र वगळता जिवंत झऱ्याचे मोबदल्यात त्या झऱ्याच्या भोवती जी जमीन आहे, त्या जमिनीतील १/४ जमीन क्षेत्र जे भरेल त्या क्षेत्राच्या मोबदल्यात गट नं.६५ मध्ये वादींच्या १/४ हिश्श्यातील जमीन प्रतिवादीचे वडील ज्ञानु तळकर यांना देणेचे कबूल करून स्वतंत्रपणे दिले आहे व त्यामध्ये प्रस्तूत प्रतिवादीचे वडिलांची व त्यानंतर वारस नात्याने प्रतिवादीची स्वतंत्र मालकी हक्काची कब्जेवहिवाट होती. त्याचेशी सदर वादींचा कोणताही संबंध नाही.

७) प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, त्यांनी त्यांच्या क्षेत्रामध्ये त्याचे घर व त्याचे वहिवाटीच्या क्षेत्रामध्ये ये–जा करणेसाठी हंगामी रिकामे ठेवले जागेवर वादी हे रस्ता असलेचे खोटे कथन करून रस्त्याचा हक्क निर्माण करू पाहत आहेत व खोटेपणाने प्रतिवादीच्या असहाय्यतेपणाचा गैरफायदा घेवून त्यांनी प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केलेला आहे.

८) प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादीने त्याचे जनावरांसाठी व जळण ठेवणेसाठी कच्चे कौलारू शेड बांधले आहे व त्यामध्ये सन २०१२ साली विजेची जोडणी घेतली आहे. रे.क.नं.१८/१९९३ चे हुकूमनामेप्रमाणे दावा मिळकत तसेच अन्य उर्वरीत वडिलार्जीत मिळकतीमध्ये ज्याची त्याची स्वतंत्र वहिवाट असून दावा मिळकतीचे पश्चिमेस असलेले जुने घर जिर्ण झालेने प्रतिवादीने त्या ठिकाणी नवीन घराचे बांधकाम केले आहे. दावा मिळकतीमध्ये जे जुने शेड होते तेही जिर्ण झालेने दुरूस्त करणेचे कामी प्रतिवादीने मे २०१७ मध्ये १६ X १६ चा पाया खणून बांधकाम केले असता वादीने प्रतिवादीस विनाकारण हरकत व अडथळा केला व सदरचे बांधकाम करणेचे नाही असे धमकाविले.

९) प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, दरम्यानचे काळात शेतीचा हंगाम आलेने व पावसाळाही सुरू झालेने प्रतिवादीने त्यांचे बांधकाम थांबविले. तथापि तद्नंतर वादींनी प्रतिवादीचे विरूध्द दावा मिळकतीबाबत प्रस्तुतचा दावा दाखल केला. त्यामध्ये वादींना मे. कोर्टाने मनाई न दिल्याच्या रागातून वादींनी दि.१३/०९/२०१७ ई. रोजी सकाळी ९॥ चे दरम्यान दावा मिळकतीमधील बांधकाम तोडून टाकले व धक्काबुक्की करून शिवीगाळी केली. त्याबाबत प्रतिवादीने वादींविरूध्द पोलीस स्टेशन, भुदरगड येथे तक्रारही दिली परंतू वादी हे राजकीय पाठबळ असणारे इसम असलेने पोलिसांनी वादींविरूध्द काहीही कारवाई केली नाही. शेवटी प्रतिवादी यांनी वादींचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेची विनंती केली.

१०) दोन्ही बाजुंच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

११) अर्ज, म्हणणे, प्रकरणातील कागदपत्रे आणि दोन्ही बाजुचे विधीज्ञांचा युक्तिवाद यावरून पुढील मुद्दे माझे विचारार्थ निघतात. त्यांना मी माझी कारणांसहित उत्तरे यापुढे नमूद करीत आहे,

| **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १] वादी प्रथमदर्शनी केस सिध्द करतात काय ? | : | नाही. |
| २] सोयीस्करतेचा तुला वादींच्या बाजुने आहे, असे ते सिध्द करतात काय ? | : | नाही. |
| ३] मागणी केलेप्रमाणे तुर्तातूर्त मनाई न दिल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे, असे वादी सिध्द करतात काय ? | : | नाही. |
| ४] काय आदेश ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे |

## :: कारणमिमांसा ::

१२) प्रस्तूत कामी वादी यांनी नि.३ सोबत अनु.नं.१ कडे खाते क्र.४०५ चा कुंडलिक तुकाराम तळकर यांचे नावचा ८/अ चा उतारा, अनु.नं.२ कडे गट नं.६५ चा ७/१२ उतारा, अनु.नं.३ कडे भुमि अभिलेख, गारगोटी यांचेकडील गट नं.६५ चा नकाशा व अनु.नं.४ कडे दावा मिळकतीचा फोटो इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्याचप्रमाणे वादी यांनी त्यांचे

अर्जाचे पुष्ट्यर्थ साक्षीदार बळवंत दादु तळकर, धनाजी लक्ष्मण चिले व नारायण आनंदा तळकर यांची शपथपत्रे दाखल केलेली आहेत. प्रतिवादीने नि.१८ सोबत अनु.नं.१ कडे वादी प्रतिवादीचे पुर्वहक्कदार यांचे दरम्यान दावा मिळकतीबाबत रे.क.नं.१८/१९९३ मधील झालेला हुकूमनामा, अनु.नं.२ कडे प्रतिवादीचे वडिलांच्या नावचे घराचे लाईट बील, अनु.नं.२ कडे प्रतिवादीचे नावचे घराचे लाईट बील, अनु.नं.४ ते ८ कडे दावा मिळकतीचे फोटोग्राफ्स् इ. कागदपत्रे दाखल केली.

**मुद्दा क्रमांक १ ते ४ च्या अनुषंगाने :**

१३) सदर चारही मुद्दे एकमेकांशी संलग्न असलेने पुनरावृत्ती टाळण्याकरिता मी ते एकत्रित विचारार्थ घेत आहे.

१४) प्रस्तूत कामी वादीतर्फे विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला आहे की, गट नं.६५ मध्ये दक्षिणोत्तर १२ फुटाचा रस्ता आहे. सदर रस्त्याचा वापर वादी, प्रतिवादी व इतर लोक करत आहेत. परंतू प्रतिवादी त्या रस्त्यावर रस्ता बंद करणेच्या उद्देशाने बेकायदेशीररित्या वाढीव घराचे बांधकाम करू पाहत आहेत. तसे झालेस प्रतिवादी व गावातील इतर लोकांचा शेताकडील जाणेचा रस्ताच बंद होणार आहे. वादीतर्फे विधीज्ञांच्या युक्तिवादानुसार, दाव्यासोबत दाखल केलेल्या समजुतीच्या नकाशावरून सदरचा रस्ता अस्तित्वात असल्याचे दिसून येते तसेच वादीतर्फे दाखल करण्यात आलेल्या दावा मिळकतीच्या वस्तुस्थितीबाबतच्या फोटोग्राफ्स्वरून देखील रस्ता असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी

सदरच्या रस्त्यामध्ये बांधकाम करून अडथळा करू नये.

१५) प्रस्तूत कामी प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला आहे की, वादींनी सकृतदर्शनी दावा मिळकत गट नं.६५ मध्ये रस्ता अस्तित्वात असल्याचे सिध्द केले नसल्याने व सदरची जागा प्रतिवादीस रे.क.नं.१८/१९९३ मधील झालेल्या तडजोड हुकूमनाम्यानुसार मिळालेली असल्याने वादींचा सदर मिळकतीशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही त्यामुळे वादी हे मागणी करतात त्याप्रमाणे तुर्तातूर्त मनाईचा आदेश मिळणेस पात्र नाहीत.

१६) प्रतिवादींनी त्यांच्या म्हणण्यापुष्ट्यर्थ *1998 A I H C 2088 [V. Devarajan V/s. R. Purushothaman and others]* या न्यायनिर्णयाचा आधार घेतला. सदर प्रकरणामध्ये,

Joint property directed to be sold and shared by shares in earlier suit. However, decree in the earlier suit is not executed. Subsequently, plaintiff claimed negligeble share in the land and filed suit for permanent injunction restraining defendant from raising of permanent construction. However, it is held that no material or substantial injury caused to plaintiff hence he is not entitled for relief.

१७) परंतू वर नमूद न्यायनिर्णयातील व प्रस्तूत प्रकरणातील वस्तुस्थिती ही विसंगत असलेने सदर न्यायनिवाड्याचा योग्य तो मान राखून, मी असे मत व्यक्त करतो की, सदरचा न्यायनिर्णय प्रस्तूत प्रकरणास लागू पडत नाही.

१८) प्रतिवादींनी त्यांच्या म्हणण्यापुष्ट्यर्थ *Arjun Jairam Parab V/s. Sonu @ Sanjay Krishna Parab [2017 (5) Bom.C.R. 229]* या न्यायनिर्णयाचा आधार घेतला. सदर प्रकरणामध्ये,

The plaintiff, in past also constructed rooms without permission of respondent. It is held that suit for injunction restraining co-owner in the joint property from raising construction is not maintainable.

१९) परंतू वर नमूद न्यायनिर्णयातील व प्रस्तूत प्रकरणातील वस्तुस्थिती ही देखील विसंगत असलेने सदर न्यायनिवाड्याचा योग्य तो मान राखून, मी असे मत व्यक्त करतो की, सदरचा न्यायनिर्णय देखील प्रस्तूत प्रकरणास लागू पडत नाही.

२०) प्रतिवादींनी त्यांच्या म्हणण्यापुष्ट्यर्थ *Kanta S. Rohra V/s. Essel Vision [1998 (2) B.C.J. 504]* या न्यायनिर्णयाचा आधार घेतला. सदर प्रकरणामध्ये,

It is held that no prima-facie case is made out by plaintiff, he is not entitled for temporary injunction.

२१) वर नमूद न्यायनिर्णयातील तत्व हे न्यायतत्व असलेने ते सदर प्रकरणास कायदेशीर दृष्टिकोनातून लागू पडते.

२२) दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम १ नुसार कोणत्याही दाव्यात शपथपत्रावरून किंवा अन्यथा एखाद्या दाव्यातील कोणत्याही वादग्रस्त मालमत्तेचा दाव्यातील कोणत्याही पक्षकाराकडून अपव्यय केला जाणेचा, तिचे नुकसान केले जाणेचा किंवा ती अन्यक्रामित केली जाण्याचा अथवा हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना तिची गैरपणे विक्री केली जाण्याचा धोका असल्याचे, अथवा प्रतिवादी त्याच्या धनकोची (फसवणूक करण्याच्या) दृष्टीने त्यांची मालमत्ता हलवण्याची किंवा तिची विल्हेवाट लावण्याची धमकी देत आहे किंवा ती मालमत्ता अशा रितीने हलवण्याचा किंवा तिची विल्हेवाट लावण्याचा त्याचा उद्देश असल्याचे सिध्द करण्यात आल्यास न्यायालयाला, दावा निकालात निघेपर्यंत किंवा पुढील आदेश दिला जाईपर्यंत, अशी कृती निरूध्द करण्यासाठी आदेशाद्वारे तात्पुरता मनाई हुकूम देता येईल.

२३) प्रस्तूत कामी संपूर्ण अभिलेखाचे व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी कायम मनाई होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे. वादी यांचे कथन असे आहे की, दावा जमिनीचे दक्षिणेस व गावठाणच्या उत्तरेस पश्चिमेकडील ओढा पात्रापासून पश्चिमेकडून पुर्वेकडे गट नं.६५ मध्ये दक्षिण बाजुकडून व तेथून पुढे अन्य शेतीकडे जा ये करणेसाठी वादी प्रतिवादींनी त्यांना व गावातील अन्य इसमांना शेतीकडे जाणेसाठी ठेवलेला दक्षिणोत्तर १२ फुटाचा रस्ता आहे. याउलट प्रतिवादींच्या कथनानुसार, तसा कोणताही रस्ता अस्तित्वात नाही. जर वादीला तुर्तातूर्त ताकिदीचा आदेश मिळवावयाचा असल्यास वादीने दावा जमिनीत दक्षिणोत्तर १२ फुटाचा रस्ता अस्तित्वात होता

व तो वादी, प्रतिवादी व गावातील अन्य इसम वापरत होते, हे सकृतदर्शनी शाबीत करणे गरजेचे आहे. ते शाबीत करण्यासाठी वादीने दाव्यासोबत समजुतीचा नकाशा जोडलेला आहे. तसेच वादींनी खाते क्र.४०५ चा कुंडलिक तुकाराम तळकर यांचे नावचा ८/अ चा उतारा, गट नं.६५ चा ७/१२ उतारा, भुमि अभिलेख गारगोटी यांचेकडील गट नं.६५ चा नकाशा व दावा मिळकतीचा फोटो इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता सकृतदर्शनी गट नं.६५ मध्ये तथाकथित रस्त्याची नोंद नसलेचे दिसून येते. याउलट भुमि अभिलेख गारगोटी यांचेकडील गट नं.६५ च्या नकाशाचे अवलोकन केले असता गट नं.६५ ला लागून पुर्व बाजूकडून उत्तरेकडे जाणारा रस्ता दिसून येतो परंतू वादी म्हणतात त्याप्रमाणे सदरचा रस्ता हा गट नं.६५ मधून जात नसलेचे सकृतदर्शनी दिसून येते. तसेच वादींनी जो मूळ दाव्यासोबत समजुतीचा नकाशा जोडलेला आहे तो देखील कोणत्याही सक्षम अधिकाऱ्याने दिलेला नाही. त्यामुळे सद्यस्थितीत त्यावर विसंबून राहणे योग्य ठरणार नाही.

२४) याउलट प्रतिवादीने जो दावा मिळकतीबाबत रे.क्र.नं.१८/१९९३ मधील झालेला हुकूमनामा दाखल केलेला आहे त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यामध्ये प्रतिवादीचे वडील ज्ञानु तळकर व वादी तसेच वादींचे पुर्वहक्कदार यांच्यात आपसांत तडजोड होवून गट नं.६५ मधील प्रतिवादीच्या वडिलांचे घर व त्याचे बाजूस पश्चिमेस असणारी अंदाजे ४ गुंठे जागा वादींचे पुर्वहक्कदार व वादी यांनी कायमपणे सोडून दिलेली आहे व त्याचे मोबदल्यात दुसरी मिळकत ही प्रतिवादीचे वडिलांनी वादी व वादींचे पुर्वहक्कदार यांना सोडलेली आहे. तसेच सदर तडजोड हुकूमनाम्यामध्ये इतर शेत मिळकतींबाबत व तद्अनुषंगिक

बाबींबाबत विशेषत: गट नं.६५ मधील ५ हॉर्स पॉवरचे इंजिन, झाडे इ. बाबतच्या वाटणीचा देखील उल्लेख आहे. जर वादी म्हणतात तसा रस्ता गट नं.६५ मध्ये असता व सदरचा रस्ता वादी, प्रतिवादी व इतर गावकरी ५० ते ६० वर्षांपासून वापरत होते तर त्याबाबतचा उल्लेख सदर हुकूमनाम्यामध्ये निश्चितच झाला असता. परंतू सदर हुकूमनाम्याचे अवलोकन केले असता वादी म्हणतात तसा गट नं.६५ मधून जाणाऱ्या रस्त्याचा उल्लेख दिसून येत नाही.

२५) वादींचे विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, सदर हुकूमनाम्याची अद्याप जिल्हाधिकारी यांचेमार्फत कलम ५४ नुसार अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे सदर हुकूनाम्यातील तथाकथित तडजोड विचारात घेता येणार नाही. परंतू माझे मते, सदर हुकूमनाम्याचा अंमल आजतागायत अस्तित्वात असून त्यास कोणत्याही वरिष्ठ न्यायालयात वादींनी आव्हानित केलेले नाही त्यामुळे सदरचा हुकूमनामा हा सद्यस्थितीत विनाआव्हानित आहे. तसेच वादीचे वकिलांनी हुकूमनाम्यातील इतर तडजोडींबाबत कोणताही वाद उपस्थित केलेला नाही. यावरून वादींचे विधीज्ञांच्या सदर युक्तिवादात सकृतदर्शनी तथ्य वाटत नाही.

२६) तसेच वादींनी दाखल केलेल्या नि.३ सोबत अनु.नं.३ ला भुमि अभिलेख गारगोटी यांनी गट नं.६५ चे दिलेल्या नकाशाचे अवलोकन केले असता सकृतदर्शनी गट नं.६५ मध्ये कोणताही रस्ता अस्तित्वात नसलेचे दिसून येते. तसेच वादींनी नि.३ सोबत अनु.नं.४ कडे जो दावा मिळकतीचा फोटो दाखल केलेला आहे, त्याचे अवलोकन केले असता तेथून एखादे माल वाहतूक करणारे वाहन जावू शकत नाही, असे सकृतदर्शनी दिसून येते. वादींनी त्यांचे अर्जाचे पुष्ट्यर्थ ३ साक्षीदारांची शपथपत्रे हजर केलेली आहेत. सदर साक्षीदारांनी वादींच्या

कथनास पुष्टी दिलेली आहे. तसेच वादी जी अंतरिम दाद या अर्जाद्वारे मागत आहेत तीच दाद त्यांची मूळ दाव्यात देखील आहे परंतू सदरील अंतरिम दादीचा आदेश देणेइतपत वादींनी सकृतदर्शनी त्यांची केस योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी शाबीत न केल्याचे दिसून येते. त्यामुळे वादींनी सकृतदर्शनी रस्ता अस्तित्वात असलेबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर सादर न केल्याने केवळ साक्षीदारांच्या तोंडी पुराव्यावर विसंबून राहणे योग्य ठरणार नाही.

२७) एकंदरीतपणे, वादी प्रथमदर्शनी त्यांची केस शाबीत करू शकलेले नाहीत. त्याप्रमाणे सोयीस्करतेचा तुला व अपरिमित नुकसानीचे तत्व हे देखील त्यांचे बाजुने नाही. सबब, उपरोक्त चर्चेनुसार, दाखल न्यायनिर्णयातील तत्वे, कायद्यातील तरतुदीनुसार आणि वर नमूद कारणांकरिता मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे व मुद्दा क्र.४ चे उत्तरार्थ पुढील आदेश पारीत करत आहे,

## :: **आदेश** ::

१] वादींचा प्रस्तूत अर्ज (नि.५) नामंजूर करण्यात येत आहे.

२] खर्चाबाबत आदेश नाही.

**सही/–**

( ए. एस्. कोष्टी )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी.

स्थळ : गारगोटी.
दिनांक : ०४/०८/२०१८.

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Mr. S. D. Sarang |
| Name of Court | : | Court of Civil Judge Junior Division, Gargoti, Tah. - Bhudargad, District - Kolhapur |
| Date of Dictation | : | 04/08/2018 |
| Order signed by the P.O. on | : | 04/08/2018 |
| Order uploaded on | : | 04/08/2018 |